# अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती

पोलीस मुख्यालयासमोर टिबी हॉस्पीटलच्या पाठीमागे अमरावती

दुरध्वनि:0721-2553966/2553967,फॅक्स:2553968 ईमेल:atcamt@yahoo.co.in

अंत्यत महत्वाचे

रजिष्टर पोस्टाने

भा.स.शि.-2017/प्रक्र/ का. 2 (5 1451 दिनांक: ~~17~~/03/2018 19

प्रति,

1*कुलसचिव,संत गाडगेबाबा विद्यापिठ अमरावती

2*कुलसचिव डॉ.पंजाबराव कृषी विद्यापिठ अकोला

3* कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद

4* कुलसचिव स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड

5*कुलसचिव मराठवाडा कृषीविद्यापिठ परभणी

6*सहसंचालक,उच्च व तंत्र शिक्षण विभाग अमरावती

7*सहसंचालक,उच्च व तंत्र शिक्षण विभाग औरंगाबाद

8* कुलसचिव भारती विद्यापिठ पुणे

विषय: भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयस्तरावर कार्यवाहीकरिता फार मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत.

संदर्भ:1) या कार्यालयाचे पत्र क्रमांक भासशि-2017/प्रक्र/का-989 दि.01/03/2018

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यापिटाअंतर्गत कार्यरत महाविद्यालयामध्ये अनुसूचित जमातमीच्या विद्यार्थ्यांची भारत सरकार शिवृत्तीच्या अर्जाची नोंदणी ई - विकास प्रणालीवर झालेली आहे. मात्र सत्र अखेर सुध्दा महाविद्यालयस्तरावर मोठया प्रमाणात अर्ज प्रलंबित आहे .

महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जाची संख्या ही खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र. | प्रकल्प कार्यालय | नोंदणीकृत अर्ज | महाविद्यालय पातळी वर प्रलंबित | जिल्हापातळी वरुन प्रयांचेकडे .अ. पाठविलेले (४-३)अर्ज | जिल्हा पातळी वर प्रलंबित | मंजूर | नामंजूर | स्थगित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| २ | अकोला | 2276 | 1975 | 301 | 65 | 233 | 0 | 3 |
| ३ | औरंगाबाद | 3595 | 2600 | 995 | 501 | 471 | 0 | 23 |
| ४ | धारणी | 4879 | 1793 | 3086 | 398 | 2627 | 0 | 61 |
| ५ | कळमनुरी | 2234 | 1202 | 1032 | 204 | 805 | 0 | 23 |

1961 22/3/18

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | किनवट | 2667 | 1276 | 1391 | 210 | 1155 | 0 | 26 |
| ७ | पांढरकवडा | 3938 | 2660 | 1278 | 498 | 761 | 0 | 19 |
| ८ | पुसद | 1544 | 1278 | 266 | 48 | 218 | 0 | 0 |
| | **एकुण** | **21133** | **12784** | **8349** | **1924** | **6270** | **0** | **155** |
| | **एकुण टक्केवारी** | | 60.49 | | 23.04 | 75.09 | 0 | 1.85 |

मार्च महीना संपत असतांना 39.51 अर्जावरच महाविद्यालयस्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे सदर बाब अतिशय गंभीर असून महाविद्यालय स्तरावर या अंत्यंत महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते आपल्या अंतर्गत येणारी महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती विषयाकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

शिष्यवृत्तीच्या अर्जावर महाविद्यालय स्तरावर तातडीने कार्यवाही करणे अपेक्षित होते उपरोक्त प्रमाणे दुर्लक्ष केलेल्या महाविद्यालयावर जबाबदारी निश्चित करुन मार्च अखेर 100% महाविद्यालयस्तरावरील प्रलंबित अर्जावर कार्यवाही होईल या दृष्टीने नियोजन करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्ज निकाली निघेल या दुष्टीने आपल्या स्तरावरुन संबधित महाविद्यालयास कळविण्यात यावे. अनुसूचित जमातीमधील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिल्यास याची जबाबदारी संबधित महाविद्यालयाची राहील याची नोंद घेण्याबाबत संबधित महाविद्यालयाना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

अपर आयुक्त
आदिवासी विकास अमरावती करिता

प्रतिलीपी:1) मा. सचिव आदिवासी विकास विभाग ,मंत्रालय मुंबई.-32 यांना महितीस्तव सादर.
2)मा. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना महितीस्तव सादर.
3) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी / पांडरकवडा / किनवट / अकोला /पुसद / कळमनुरी / औरंगाबाद/ आपणास कळविण्यात येते ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीच्या अर्जावर कार्यवाही करणे प्रलंबित आहे अशा सर्व महाविद्यालयामध्ये आपल्या अधिनस्त कार्यरत कर्मचा-यांना पाठवून संबधित प्राचार्ययांची भेट घेवून सदर बाब त्यांचे निदर्शनास आणुन देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत आदेशित करावे.

अपर आयुक्त
आदिवासी विकास अमरावतीकरिता

मुळ प्रतीवर मा. अ.आ.यांची स्वाक्षरी आहे.